# पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांची व पुलांची माहिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत नागरी सुविधांअंतर्गत असणारा एक भाग म्हणजे दळणवळण होय. म्हणुनच रस्त्यांना शहराची जीवनरेखा म्हटले तर वावगे होणार नाही. वैद्यकिय भाषेत सांगावयाचे झाले तर रस्ते म्हणजे शहराच्या रक्तवाहिन्या आहेत.

सन १९५६ मध्ये हिंदुस्थान अँटिबायोटिक्स कंपनी स्थापन झाल्यानंतर इतर अंतरराष्ट्रीय कंपन्या या शहरात अस्तित्वात आल्या. त्या नंतर या ठिकाणी उपलब्ध असणारे पाणी, रोजगार, जमीन, जमिनीची मशागत हे सर्व घटक विचारात घेऊन या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) ची स्थापना याच कालावधीत झाली आणि रोजगारासाठी अनेक ठिकाणाहुन लोक येथे येवू लागले त्या अनुषंगाने विकास योजना व प्राधिकरणाचा उदय झाला. १९७० मध्ये पिंपरी चिंचवड नगरपालिका आस्तित्वात आली. सुरुवातीला नगरपालिकेमध्ये ४ गावांचा समावेश होता. त्यानंतर १९७५ मध्ये वर्ग १ नगरपालिकेत रूपांतर करण्यात आले. १९८२ मध्ये नगरपालिकेत आणखी ७ गावांचा समावेश करून महानगरपालिकेत रूपांतर करण्यात आले. त्यानंतर १९९७ मध्ये पुन्हा १८ नवीन गावांचा म.न.पा. हद्दीत समावेश झाला म्हणुन नागरिकांची मोठ्या प्रमाणात दळणवळण प्रक्रिया वाढलेली आहे. या भागात मोठ्या कंपन्या आहेत, कंपनीतील संचालक किंवा विदेशी पाहुणे येत असतात. सर्व साधारणपणे असे लोक विमानाने किंवा हेलीकॉप्टरने येत जात असतात. तर इतर लोक रेल्वेने आणि बस किंवा स्वत:च्या वाहनातुन ये-जा करतात. यामुळे दळणवळण प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणावर ताण वाढला. सर्वसाधारणपणे दळणवळणासाठी खालीलप्रमाणे स्त्रोत उपलब्ध आहेत.

१) हवाई मार्ग - विमान, हॅलीकॉप्टर

२) जल मार्ग - जहाज, बोटी

३) जमीन मार्ग - रेल्वे, रस्ते

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात विमानतळ नाही. तरी, या परिसरात एका विमानतळाची किंवा हेलीपॅडची आवश्यकता आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सर्व परिसर पाण्याने व्यापलेला असल्याने (उदा. उत्तरेस इंद्रायणी, दक्षिणेस मुळा, तर मध्यभागातुन पवना नदी वाहते) या सर्व नद्यांचा वापर दळणवळणासाठी करणेबाबत विचार होणे आवश्यक आहे. त्याशिवाय अनेक नागरिक रेल्वेने प्रवास करतात. पिंपरी चिंचवड

महानगरपालिका हद्दीतुन रेल्वे मार्ग असुन या परिसरात एकुण ५ रेल्वे स्टेशन आहेत. (उदा :- आकुर्डी, चिंचवड, पिंपरी, कासारवाडी, दापोडी) सदर रेल्वे मार्गाचा नागरी व मालवाहतुकीसाठी मोठ्या प्रमामावर वापर होत आहे.

त्याचप्रमाणे नागरी व मालवाहतुकीसाठी रस्त्यांचा मोठया प्रमाणावर वापर होत असतो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातुन शहरअंतर्गत व शहराबाहेरील दळणवळणासाठी उपलब्ध असलेल्या रस्त्यांची माहिती खालीलप्रमाणे.

१) राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ म.न.पा. परिसरातील मध्यभागातुन जातो. त्याची लांबी सर्वसाधारणपणे १२.५ कि.मी. आहे. पुणे - मुंबई शहरांना जोडण्यासाठी सदर मार्गाचा उपयोग होतो.

२) तसेच पुणे - मुंबई शहरांना जोडण्यासाठी औंध मार्गे महामार्ग उपलब्ध असुन त्याची लांबी ७.२० कि.मी. इतकी आहे.

३) त्याशिवाय शहराच्या पश्चिमेकडे पुणे -नाशिक राज्य महामार्ग क्र. ५६ आहे.

४) त्याशिवाय राष्ट्रीय महामार्ग क्र. ५० पुणे ते नाशिक या भागाच्या पुर्वेकडून जातो. त्याची लांबी ११.५ कि.मी. इतकी आहे.

**शहराअंतर्गत दळणवळणासाठी खालीलप्रमाणे रस्ते उपलब्ध आहेत :**

१) जुना मुंबई - पुणे रस्ता भोसरी गावठाण व पुणे - नाशिक रोड तसेच निगडी गावठाणाजवळ मुख्यत: सदर रस्ता एम.आय.डी.सी. परिसरातील व से. २१ च्या निवासी क्षेत्रांना उपयुक्त आहे.

२) स्पाईन रोड ४५ मी. रूंद निगडी जकात नाका ते रेल्वे लाईन से. २० पर्यंत चा परिसर हा प्राधिकरणातील निवासी क्षेत्र म्हणून ओळखला जातो. सद्यस्थितीत रोडची लांबी २.१० कि.मी. आहे.

३) प्राधिकरणातील २४ मी. रूंद टिळक रोड, हे मुंबई - पुणे रोडला पुर्वेला व पश्चिमेला आकुर्डी रेल्वे स्थानक येथे मिळतो व तो परिसर निवासी क्षेत्र म्हणुन ओळखला जातो.

४) खंडोबा माळ येथुन मुंबई - पुणे रस्त्यावरून निघालेला रस्ता हा प्राधिकरण क्षेत्रात आकुर्डी गावठाणातुन जातो. सदर रस्ता अरूंद होता परंतू सदर रस्त्याचे सद्यस्थितीत रूंदीकरण करण्यात आले आहे. तेथे मुख्यत: आकुर्डी गावठाण व प्राधिकरण निवासी क्षेत्र म्हणून ओळखला जातो.

५)	चिंचवड गावठाणातून निघालेला व खंडोबा माळ येथे जात असलेला रस्ता अरूंद असुन दळवीनगर येथील रेल्वे क्रॉसिंग ब्रीज पुलावरून जातो. सदर ओव्हरब्रीज बांधल्यामुळे चिंचवड येथील निवासी क्षेत्र व एम.आय.डी.सी. चा परिसर यांना जोडण्यासाठी हा रस्ता अत्यंत उपयुक्त आहे.

६)	चिंचवड गावठाण ते चिंचवड परिसराला जोडणाऱ्या रस्त्यावर रेल्वे ओव्हरब्रीज बांधण्यात आलेला आहे. चिंचवड गावठाण व चिंचवड स्टेशन तसेच एम.आय.डी.सी. तील निवासी रहिवाशांसाठी सदर रस्त्याचा उपयोग केला जातो.

७)	चिंचवड गावठाण ते पिंपरी कॅम्प हा परिसर अत्यंत अरूंद रोडने जोडला गेलेला आहे. परंतू पिंपरी परिसरात रेल्वे ओव्हरब्रीज कार्यरत असल्याने सदर रोडवरील वाहतुकीचे प्रमाण जास्त आहे. सदर रस्त्याचे रूंदीकरण करण्यात आले असुन लिंक रोड म्हणुन रस्ता परिचित आहे.

८)	मुंबई-पुणे महामार्गावरून दक्षिणेकडे जाणारा भाग पिंपरी गावात जातो व उत्तरेकडील भाग मोरवाडी परिसरातुन एम.आय.डी.सी. परिसरात जातो. सदरचा रोड हा पिंपरी गाव व पिंपरी कॅम्प मधील निवासी क्षेत्रातील नागरिकांना एम.आय.डी.सी. क्षेत्राकडे जाणेकरिता फारच उपयोगी आहे.

९)	पिंपरी परिसरातील ओव्हरब्रिजवरून निघालेला रस्ता नेहरूनगर मार्गे एम.आय.डी.सी. क्षेत्रात जात असुन एम.आय.डी.सी. क्षेत्र व पिंपरी कॅम्पमधील रहिवाशांना फारच उपयोगी आहे.

१०)	लांडेवाडीमधुन निघालेला रस्ता पुणे - नाशिक महामार्गास ॲटलास फॅक्टरीजवळ मिळतो. सदर रस्ता हा भोसरी गावठाणातील रहिवाशांसाठी उपयुक्त आहे. तसेच भोसरी रूग्णालय, पिंपरी चिंचवड वाहन व्यवहार विभाग, बस स्टॉप, भाजी मार्केट परिसरातील नागरिकांसाठी सदर रस्ता उपयुक्त आहे.

११)	मुंबई - पुणे रोड इंडस्ट्रियल ऑक्सिजन कंपनीजवळचा काही भाग हा उत्तरेस नेहरूनगर येथून जातो. सदर भाग म्हाडा परिसरातील नागरिकांसाठी उपयुक्त आहे. तसेच सदर रस्ता कासारवाडी रेल्वे स्टेशनकडुन पुण्याकडे जातो. तसेच सदर रस्ता संत तुकारामनगर कडे जातो. सदर रस्त्यावर असणारी अतिक्रमणे हटवून हा रस्ता रूंद करण्यात आला आहे.

१२)	मुंबई - पुणे रोडचा हिंदुस्थान ॲंटिबायोटिक्स जवळील काही भाग हा पिंपरी डेअरी फार्मजवळून असणारी अतिक्रमणे हटवून हा रस्ता रूंद करण्यात आला आहे.

१३) पिंपरी गावठाणजवळील नव महाराष्ट्र हायस्कुलपासून पिंपळे सौदागरकडे १०० फुटी रूंद असणारा रस्ता पवना नदीवरील पुलावरून जातो. पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या नवीन गावांतील रहिवाशांसाठी सदर रस्ता उपयुक्त आहे.

१४) पुणे - नाशिक महामार्ग पुर्वेकडून भोसरी शाळेजवळुन आळंदी रोडला मिळतो.

१५) औंध रोडवरुन निघणारा रस्ता थेरगांव नाक्याजवळुन चिंचवड गावठाणात जातो. सदर रोड पवना नदीवरील पुलावरून जातो. पश्चिमेकडे सदर रोड राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ला थेरगांव नाक्यापासुन ५ कि.मी. वर मिळतो.

१६) औंध रोड हा वाकड टँक जवळून पिंपरी कॅम्प परिसरास पवना नदीवरील पुलावरुन मिळतो. सदर पुल हा नुकताच बांधला गेला असुन पिंपरीतील औद्योगिक परिसरासाठी सदर रस्ता अत्यंत उपयुक्त आहे.

१७) औंध रस्ता हा जगताप डेअरी पासुन रहाटणी आणि पिंपळे सौदागर गावठाणला मिळतो. सदर रस्ता हा येथील रहिवाशी नागरिकांना पुणे व पिंपरी कॅम्प येथे जाणे - येणेसाठी उपयुक्त आहे.

१८) औंध रस्ता हा मिलिट्री क्वार्टरपासुन निघून वाकड गावठाणला मिळतो व तेथून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ला मिळतो.

१९) औंध रस्ता ईएसआयएस रुग्णालयाजवळून सांगवी गावठाणला मिळतो. सदर रस्ता मुख्यत: मिलिट्री परिसरातून जातो.

२०) एम.आय.डी.सी. परिसरातील रोड हा रुंदीच्या दृष्टीने समाधानकारक आहे.

२१) चिंचवड स्टेशन परिसराकडे व पुर्वेकडून एम.आय.डी.सी. कडे जाणारा मुंबई - पुणे रस्ता हा स्टेशनजवळ अत्यंत अरुंद होता परंतू सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले आहे.

तरी ज्या ठिकाणी जड वाहने मोठ्या प्रमाणावर ये-जा करतात आणि ज्या रस्त्यांवर वाहनांची संख्या जास्त असते अशा तीन प्रमुख रस्त्यांवर (उदा. मुंबई - पुणे महामार्ग क्र.४, (टेल्को रोड, थरमॅक्स रस्ता ) निगडी ते भोसरी, मुंबई - पुणे औंध रस्ता ) सिमेंट कॉक्रीटचे रस्ते डिफर्ड पेमेंट तत्वावर तयार करणे आवश्यक आहे किंवा केंद्र शासनाचे जे.एन.एन.यु.आर.एम.कडुन निधी प्राप्त करून कारवाई करणेत येत आहे. तसेच रस्त्यांची पुर्ण माहिती (उदा. रस्त्यांची लांबी, संख्या, अंदाजे रुंदी, दर्जा, केव्हा व कोणी बांधले, त्याची आयुमर्यादा व इ.) असणारी पुस्तिका अद्यावत असणे आवश्यक आहे.

### रस्त्याची सविस्तर माहिती :

| प्रकार | सन ०१- ०२ | सन ०२-०३ | सन ०३-०४ | सन ०४-०५ | सन ०५-०६ | सन ०६-०७ | सन ०७-०८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कच्चे रस्ते | ३५ कि.मी | १४० कि.मी | १३८ कि.मी | १३५ कि.मी | १३४ कि.मी | १३४ कि.मी | ९६ कि.मी |
| पक्के रस्ते | ५७८ कि.मी | ६४८ कि.मी | ७१८ कि.मी | ७५० कि.मी | ७९१ कि.मी | ८८९.६५ कि.मी | ३४८ कि.मी |
| गति रोधक | ९८२ | १०४२ | १००७ | १०६७ | २५ | ० | ० |

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांची (१२ मी. पेक्षा कमी रुंदी ) ची माहिती :

| वॉर्ड | डांबरी रस्ते | | डब्ल्यु.बी.एम. रस्ते | | कॉंक्रीट रस्ते | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लांबी (मी.) | क्षेत्र (स्क्वे मी.) | लांबी (मी.) | क्षेत्र (स्क्वे मी.) | लांबी (मी.) | क्षेत्र (स्क्वे मी.) |
| अ | २३३९१८.३ | १४२५६५७ | ३८८६१ | २६९६३२ | १४५१९ | २५०४० |
| ब | १०६१०७ | ७३८२११ | ४६६८० | २७०१२५ | ८२५५ | ५८९८१ |
| क | १००१०५ | ५३३०१६ | २३५२९ | १२३९७ | ५८९२३ | १४९१५४ |
| ड | २१४०६४ | १४०५०५३ | ३६०५५ | १५१३४१ | १२३७५ | ३१५६९७ |
| एकुण | ६५४१९४ | ४१०१९३७ | १४५१२५ | ७०३४९५ | ९४०७२ | ५४८८७२ |

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांची (१२ मी. पेक्षा जास्त रुंदी) ची माहिती

| वॉर्ड | १२ - १९ मी. | २० - २९ मी. | ३० - ४९ मी | ५० - ६१ मी |
|---|---|---|---|---|
| अ | १२७०२७ | ३९५९० | ३६८५७ | १०५५ |
| ब | ३४४२५ | १७७४७ | १३६८३ | ४०६६ |
| क | ३६२२२ | ३३०४८ | १५७०२ | २५५४ |
| ड | ३४५६४ | २८४१२ | २१४६३ | ० |
| एकुण | २३२२३८ | ११८७९७ | ८७७०५ | ७६७५ |

उपलब्ध असणाऱ्या वाहनांची संख्या, कारखान्यांची संख्या व लोकसंख्येत दरवर्षी होणारी वाढ याची तुलना केली असता त्या प्रमाणात रस्त्यांच्या संख्येत व रुंदीत वाढ दिसुन येत नाही त्यामुळे उपलब्ध असणाऱ्या रस्त्यांवरुन वाहतुक होत असल्याने या रस्त्यांवरच ताण पडत आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होऊन पर्यायाने प्रदुषण वाढते आहे. म्हणुनच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मागील तीन वर्षापासून रस्ता रुंदीकरण कार्यक्रम हाती घेतला आहे. म.न.पा.च्या वतीने शहराबाहेरील व शहरातील रस्ता रुंदीकरण केलेल्या रस्त्यांची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे :

| अ.क्र | मोठे रस्ते | रस्ता रुंदीकरण लांबी | रस्ता रुंदीकरण रुंदी | क्षेत्रफळ (चौ.मी) |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई - पुणे रस्ता (६१ मी) | ५४४५ मी. | १३.२५ मी. | ७२,०८० |
| २ | औंध - रावेत रस्ता (४५ मी.) (जुना मुंबई - पुणे रस्ता) | १८०० मी. | १३ मी. | २३,४०० |
| ३ | पुणे - नाशिक रस्ता (४५ मी.) | १८०० मी. | १८.३३ मी. | ३३००० |
| ४ | टेल्को रस्ता (६१ मी.) | २००० मी. | ५ मी. | १०००० |
| ५ | चाफेकर चौक,डांगे चौक ते गणेशनगर (४५ मी.) मुंबई - बैंगलोर हायवे | ५५० मी. | ९ मी. | ४९५० |
| ६ | डांगे चौक ते ताथवडे | २५० मी. | २६ मी. | ६५०० |
| ७ | काळेवाडी मुख्य रस्ता (४५ मी.) | १६०० मी. | ४ मी. | ६४०० |
| ८ | तळवडे गावठाण | ३२०० मी. | २४ मी. | ७६,८०० |
| ९ | कृष्णानगर | १४५०० मी. | १८ मी. | २६१००० |
| १० | वॉर्ड क्र. ७ ते ८ | १०००० मी. | ९ मी. | ९०००० |
| ११ | शाहु नगर संघवी केसरी कॉलेज | १०२०० मी. | १८ मी. | १८३५५० |
| १२ | एच.डी.एफ.सी. कॉलनी | ३६०० मी. | १८ मी. | ६४८०० |
| १३ | संभाजीनगर (वॉर्ड क्र. ४२) | ९८०० मी. | १८ मी. | १७६४०० |
| १४ | सॅन्डवीक कॉलनी (नुरमोहल्ला डी.पी.) | १५० मी. | ८ मी. | १२०० |
| १५ | सॅन्डवीक कॉलनी (दिघी मुख्य रस्ता) | ८५० मी. | ६ मी. | ५१०० मी. |
| १६ | इंद्रायणी नगर (साई चौक) | १०० मी. | ३.५ मी. | ३५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | इंद्रायणी नगर (चैतन्य पार्क) | ३५० मी. | ३ मी. | १०५० मी. |
| १८ | वाघजाई हॉटेल ते गारवा हॉटेल | ७५० मी. | १८ मी. | १३५०० मी. |
| १९ | रहाटणी ते महादेव मंदिर, रामनगर ते रहाटणी चौक इ. | ३००५ मी. | ६ मी. | १९०६५ |
| २० | रहाटणी (मेन रोड) | २४०० मी. | ६ मी. | १४४०० |
| २१ | लिंक रोड | ७५० मी. | ६ मी. | ४५०० मी. |
| **लहान रस्ते** | | | | |
| १ | आकुर्डी गाव मुख्य (खंडोबामाळ ते आकुर्डी) मनपा हॉस्पीटल पर्यंत | ११५ मी. | १५ मी. | ५७५ |
| २ | पिंपरी चिंचवड लिंक रोड | ८३० मी. | ३ मी. | २४६३ |
| ३ | डांगे चौक ते पदमजी पेपरमील रस्ता | १४०० मी. | ६ मी. | ८४०० |
| ४ | लोकमान्य हॉस्पीटल ते चाफेकर चौक रस्ता | १५०० मी. | ८ मी. | २०००० |
| ५ | वाल्हेकरवाडी ते चिंचवड चाफेकर चौक रस्ता | २५०० मी. | १४ मी. | ३५००० |
| ६ | चाफेकर चौक ते बिजलीनगर रस्ता | १२०० मी. | २ मी. | २४०० |
| ७ | अमृतेश्वर कॉलनी, अजमेरा ते आयुक्त निवासस्थान | ६५० मी. | ६ मी. | ३९०० |
| ८ | के.एस.बी. चौक ते शाहूनगर | ७५५ मी. | १५ मी. | ११३२५ |
| ९ | वॉर्ड क्र. ७ ते ८ | ६५०० मी. | ६ मी. | ५१०० |
| १० | बोऱ्हाडेवाडी | ३०० मी. | ३ मी. | ९०० |
| ११ | गव्हाणेवस्ती | ५५० मी. | ६ मी. | ३३०० |
| १२ | लांडेवाडी | ३२० मी. | ६ मी. | १९२० |
| १३ | महात्मा फुले नगर | ३०० मी. | ६ मी. | १८०० |
| १४ | रक्षक चौक ते पिंपळे निलख गावाकडे जाणारा रस्ता | ३१०० मी. | १.७५ मी. | ५४.२५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | जुनी काटे पिंपळे रस्ता व वाघेरे कॉलनी क्र. १ | ११०० मी. | ६.० मी. | ६६०० |
| १६ | गजानन महाराज नगर | ०.३५ मी. | ४.० मी. | १.४० |
| १७ | सुदर्शन नगर | ०.३५ मी. | ४.० मी. | १.४० |
| **अंतर्गत रस्ते** | | | | |
| २४ अंतर्गत रस्ते | | २००२३.०६ मी. | ४.७ मी. | १८५३०० |

सुमारे १४,०८,३०६ चौ. मी. रस्त्याचे रुंदीकरण करुनही वाहतुकीच्या कोंडीची समस्या सुटत नाही. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) रस्त्यावर असणारी अतिक्रमणे, हातगाडी टपऱ्या इ.

२) रस्त्यावर पार्किंग करणे.

३) फूटपाथवरील अतिक्रमण.

**१) रस्त्यावरील अतिक्रमण :-** रस्त्याचा वापर मुख्यत: वाहतुकीसाठी असतो. परंतू वाढती लोकसंख्या व त्यामुळे वाढत असलेला बेरोजगार यामुळे नागरिकांनी आपल्या उपजिविकेसाठी छोटे छोटे उद्योग सुरु केले आहेत. सदर नागरिक आर्थिक परिस्थितीमुळे अधिकृतरित्या बांधलेले दुकान खरेदी करु शकत नाहीत त्यामुळे ते उपलब्ध असलेल्या पैशातून हातगाडी किंवा टपरी खरेदी करतात. आणि भेळ, पाणीपुरी, दुधकेंद्र, छोटे किराणा दुकान लावतात. तर काही लोक अत्यल्प पैशातून भाजी विकणे, चांभारकाम इ. रस्त्यावर किंवा फुटपाथवर करतात आणि त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. मनपा अंतर्गत अशी वाहतुकीची कोंडी होणारी ठिकाणे पुढीलप्रमाणे पिंपरी क्रुप इंडस्ट्रीजवळच्या फुटपाथवर, पिंपरी भाजी मंडई जवळील सर्व भाग, पिंपरी कॅम्प, आकुर्डी रोड ते आकुर्डी गाव, भेळ चौक, प्राधिकरण, निगडी बसस्टॉप, निगडी ते यमुनानगर, वायसीएमएच जवळ संत तुकारामनगर, अजमेरा, वास्तु उद्योग, लांडेवाडी, भोसरी, दापोडी, चिंचवड, चाफेकर चौक, गांधी रोड, चिंचवड अशा सर्व ठिकाणी दिसतात व रस्त्यावरील वाहतुकींना अडथळा निर्माण करतात ज्यामुळे वायुप्रदुषणात भर पडते. म्हणून या प्रकारचे अतिक्रमण काढणे आवश्यक आहे किमान जे अतिक्रमण वाहतुकीस अडथळा निर्माण करते किंवा नियोजित विकास आराखड्यात येते अशा प्रकारचे अतिक्रमण तरी प्राधान्याने काढणे आवश्यक आहे.

**२) फुटपाथ :-** पदपथाचा वापर फक्त नागरिकांना चालण्यासाठी होत असतो. परंतू पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात त्याचा वापर छोट्या व्यवसायासाठी होत असल्याचे निदर्शनास येते. सदर

पदपथावर दुधकेंद्र, पाव बिस्किटे व गोळ्या कपडे विक्रीची दुकाने दिसून येतात. त्यापैकी फक्त प्राधिकरण सोडल्यास इतर ठिकाणी पदपथांवर अतिक्रमण झाल्याचे दिसून येते. तसेच अनेक ठिकाणी फुटपाथ मोडलेले सुध्दा दिसून येते. फुटपाथवरील सर्व अतिक्रमणे हटविणे आवश्यक आहे.

**३) पार्किंग व्यवस्था :-** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा १९७१ मध्ये विकास आराखडा तयार केला. त्यानंतर १९८१ मध्ये काही ठिकाणी पार्किंग सुचविण्यात आली होती, त्यासाठीचे क्षेत्रफळ ठरविण्यात आले होते. परंतू त्यापैकी काही ठिकाणी काम झाले, म्हणजे कासारवाडी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पार्किंग करण्यात आलेले ट्रक्स प्राधिकरणातील वाहतुक नागरी येथे हलविण्यात आल्याने वाहतुकीची कोंडी होत नाही. पिंपरी भाजी मंडई जवळ अंदाजे १२०० चौ.मी. वाहनतळ व साई चौक येथे ३०० चौ.मी. वाहनतळ बांधले आहेत.

१) आकुर्डी, खंडोबा माळ

२) नाशिक फाटा

या ठिकाणी विकास आराखड्यामध्ये सुचविल्याप्रमाणे पार्किंग व्यवस्था झालेली नाही. ते काम प्राधान्याने करणे आवश्यक आहे. या शिवाय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे खाजगी बसेस, ट्रॅव्हलींग कंपन्यांमध्ये वाढ होत आहे. सदर कंपन्या त्यांच्या गाड्या रस्त्यावरच लावत असल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण होते. सर्वसाधारणपणे खालील ठिकाणी हे प्रमाण जास्त दिसून येते.

४) पिंपरी चिंचवड प्रेक्षागृह

५) काळेवाडी, प्राधिकरण

६) नेहरूनगर

७) संत तुकारामनगर येथील चौक.

तरी यावर अधिकाऱ्यांमार्फत योग्य ते नियंत्रण ठेवून दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे.

तसेच मुंबई - पुणे महामार्गावर मोठ्या प्रमाणात नागरिकांची व मालाची वाहतुक होत असते त्यात सार्वजनिक वाहनांसाठी बसस्थानके योग्य त्या ठिकाणी होणे आवश्यक आहे परंतू तसे होत नाही. त्यामुळे बसेस रस्त्यावरच थांबतात आणि वाहतुकीत अडथळा निर्माण होतो. तसेच रिक्षासुद्धा योग्य थांबा नसल्याने रस्त्यावरच थांबतात. आणि वाहतुकीत अडथळा निर्माण होतो. पर्यायाने वायु प्रदुषणास कारणीभुत ठरतात. या कामी मनपाच्या वतीने मोबिलीटी मिटींग मध्ये रिक्षा स्टॅन्ड साठी जागा निश्चित केलेली आहे.

त्याच ठिकाणी रिक्षा लावण्यासाठी बंधन करणे आवश्यक आहे तसे न झालेस त्यांचेवर आर.टी.ओ. व मनपा उपद्रव शोधपथका मार्फत कारवाई करण्यात यावी.

**म.न.पा. हद्दीमध्ये झालेल्या अपघातांची माहिती**

| अ.क्र | प्राणांतिक अपघात | गंभीर अपघात | किरकाळ अपघात | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ७५ | ४८ | ३६९ | ४९२ |

**निष्कर्ष :-** वाहन चालवताना हयगय, दुर्लक्ष, भरघाव वेग यामुळे अपघात होतात. वर नमुद केलेल्या सर्व बाबींमुळे फक्त वायुप्रदुषण होत नसुन अपघात सुध्दा होतात. मागील वर्षी झालेल्या अपघातांची माहिती सोबत जोडली आहे. त्याचे अवलोकन केले असता एकूण ४९२ अपघात झाले आणि ७५ मयत झाले. या अपघातांपैकी ७५ प्रार्णतिक, ४८ गंभीर स्वरूपाचे तर ३६९ किरकोळ स्वरूपाचे अपघात झाले आहेत.

**नदी व रेल्वेवरील पुलांची माहिती :-**

सन १९८२ मध्ये नगरपालिकेचे रूपांतर ७ गावांचा समावेश करून महानगरपालिकेमध्ये झाले आणि ही ७ गावे पवना नदीच्या दक्षिणेकडे आहेत. त्या ठिकाणाहुन येणारे नागरिक पुणे किंवा थेरगांवहुन ये जा करीत होते. त्यामुळे वाहनांचा व वाहन इंधनाचा जास्त वापर होत होता. वाहन इंधनाचा आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी नदीवरील किंवा रेल्वेवरील पुल बांधणे आवश्यक होते. ज्यामुळे वायुप्रदुषणावर काही प्रमाणात नियंत्रण होत होते. म्हणुन महानगरपालिकेने पुल बांधले आहेत त्याची माहिती खालीलप्रमाणे :

**सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या पुलांची माहिती :**

१) नगरपालिका काळात चिंचवड ते थेरगाव नदीवरील पुल

२) १९७१ - मुंबई-पुणे रोड ते चिंचवडगाव रेल्वे ओव्हरब्रीज रस्ता रूंदीकरण

३) १९८१ - पिंपरी गाव ते पिंपळे सौदागर नदीवरील पुल

४) १९९० - मुंबई-पुणे रोड, पिंपरी ते पिंपरी कॅम्प जोडणारा पुल

५) १९९१ - पिंपरी कॅम्प ते काळेवाडी पुल

६) १९९५ - चिंचवडगाव, केशवनगर ते काळेवाडी

७) १९९५ - सांगवी ते औंध नवा पुल

८) १९९५ - चिंचवडगाव मंदिर (मोरया गोसावी) ते थेरगाव (धनेश्वर पुल)

९) १९९५ - दळवीनगर, चिंचवड ते आकुर्डी, रेल्वे ओव्हरब्रीज

१०) १९९५ - सांगवी ते बोपोडी नदीवरील पुल

११) १९९७ - सांगवी स्पायसर कॉलेज नदीवरील पुल
१२) २००१ - सांगवी ते दापोडी एस.टी. वर्कशॉपजवळील नदीवरील पुल
१३) २००१ - स्पाईन रोड, प्राधिकरण चे चिंचवड वाल्हेकरवाडी रेल्वेवरील पुल
१४) २००१ - सांगवी पुणे रोड, औंध पुणे जुना पुल नुतनीकरण
१५) २००२ - महादेव मंदिर, पिंपरी ते रहाटणी नदीवरील पुल
१६) २००२ - मिलिंदनगर, पिंपरी ते काळेवाडी नदीवरील पुल
१७) २००३ - पुणे-मुंबई रस्त्यावर निगडी टिळक चौक उड्डान पुल

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुलांची माहिती

| अ.क्र. | नाव | पूर्ण | चालू | प्रस्तावित | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | नदीवरील पुल | १३ | १ | २ | १६ |
| २ | रस्त्यावरील पुल | १ | - | ३ | ४ |
| ३ | ग्रेड सेप्रेटर | १ | १ | २ | ४ |
| ४ | सब वे | ३ | २ | - | ५ |
| ५ | रेल्वे वरील पुल | ४ | - | १ | ५ |
| ६ | रेल्वे सब वे | १ | - | - | १ |
| ७ | रेल्वेवरील पादचारी मार्ग | - | - | २ | २ |
| | एकूण | २३ | ४ | १० | ३७ |

## पवना व मूळा नदीवरील पुल

| अ.क्र. | पुलाचे नाव | जोडली गेलेली गावे |
|---|---|---|
| **कार्यरत असणारे पुल** | | |
| १ | औंध स्पायसर कॉलेज ते सांगवी पुल | औंध, बोपोडी ते सांगवी परिसर |
| २ | सांगवी ते दापोडी पुल (२ पुल) | सांगवी, दापोडी |
| ३ | सांगवी ते बोपोडी पुल | बोपोडी - सांगवी |
| ४ | कासारवाडी ते पिंपळे गुरव पुल | कासारवाडी, पिंपळे गुरव |
| ५ | पिंपळे सौदागर ते पिंपरी गाव | पिंपरी गाव ते पुणे बाजूकडील परिसर |
| ६ | काळेवाडी ते पिंपरी कॅम्प | काळेवाडी, रहाटणी, पिंपरी कॅम्प |
| ७ | काळेवाडी ते चिंचवड केशवनगर पुल | चिंचवडगाव ते रहाटणी काळेवाडी केशवनगर |
| ८ | धनेश्वर पुल | चिंचवडगाव, थेरगांव |
| ९ | औंध - सांगवी मुळा नदी | पुणे व पिंपरी चिंचवड |
| १० | चिंचवड ते थेरगांव पुल | थेरगांव, चिंचवड |
| ११ | महादेव मंदिर (पिंपरी) ते रहाटणी काळेवाडी | पिंपरी, काळेवाडी , रहाटणी |
| १२ | मिलिंद नगर ते पिंपरी ते काळेवाडी | पिंपरी, काळेवाडी |

| | | |
|---|---|---|
| **काम चालू** | | |
| १ | पिंपळे निलख - बाणेर | पिंपळे निलख, काळेवाडी, जगताप डेअरी, बाणेर, बालेवाडी |

**नियोजित पुल / प्रस्तावित पुल**

१) थेरगांव बोटक्लब ते वाल्हेकरवाडी

२) भाटनगर ते काळेवाडी

**एम.एस.आर.डी.सी. मार्फत चालू असलेले**

१) रावेत ते औंध - पुनावळे

काम पुर्ण होऊन वापरत असलेले रेल्वे मार्गावरील पुल

| अ.क्र | पुलाचे नाव | जोडली गेलेली गावे |
|---|---|---|
| १ | स्पाईन रोड प्राधिकरण ते वाल्हेकरवाडी चिंचवड | प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, वाल्हेकरवाडी |
| २ | आकुर्डी ते दळवीनगर रेल्वे ओव्हरब्रीज | चिंचवडगांव, दळवीनगर, आकुर्डीगाव |
| ३ | पुणे - मुंबई रस्ता चिंचवड रेल्वे ते ओव्हरब्रीज | पुणे-मुंबई रस्ता ते चिंचवडगांव परिसर |
| ४ | मुंबई - पुणे रोड पिंपरी ते पिंपरी कॅम्प ओव्हरब्रीज | पुणे-मुंबई रस्ता, पिंपरी कॅम्प, पिंपरी गाव परिसर |
| **काम चालु असलेल्या रेल्वे मार्गावरील पुल** | | |
| १ | दापोडी ॲटो जेम्स | सांगवी व औंध भागाकडे जाण्याकरिता |
| **प्रस्तावित रेल्वे मार्गावरील पुल** | | |
| ५ | जे.जी.ग्लास कं. जवळील रेल्वे मार्गावरील पुल | पिंपरी, पुणे - मुंबई रस्ता |

सबवे ची माहिती

| | |
|---|---|
| **पुर्ण झालेले सबवे** | |
| १ | आकुर्डी |
| २ | कासारवाडी |
| ३ | फुगेवाडी |
| ४ | ब्रीज मोहनगर |

| | | |
|---|---|---|
| ५ | अडवाणी कं. जवळ | |
| ६ | डी- ३, एम.आय.डी.सी. | |
| ७ | वाकड पोलीस चौक येथे मुंबई-पुणे हाय वे बाह्य वळण | |
| ८ | हिंदुस्थान ॲन्टीबायोटिक्स कंपनी ते कॉलनी | |
| ९ | संत तुकारामनगर एस.टी.स्टॅन्ड ते सरसन कंपनी मुंबई पुणे रोड | |
| **नियोजित सब वे** | | |
| १ | डाल्को कंपनी ते साई चौक | |
| **रस्त्यावरील पुर्ण झालेले उड्डाण पुल** | | |
| १ | पुणे-मुंबई रस्त्यावर निगडी (टिळक चौक) | पुणे-मुंबई रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी झाला आहे. |
| **नियोजित उड्डाण पुल** | | |
| १ | नाशिकफाटा कासारवाडी येथे पुणे-मुंबई रेल्वे व पवना नदी यांना जोडणारा उड्डाण पुल | पुणे - मुंबई रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होणार आहे. |
| २ | भोसरी | |

| | |
|---|---|
| **काम पुर्ण झालेला ग्रेड सेप्रेटर** | |
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवना समोरील मुंबई - पुणे रस्त्यावर |

| | |
|---|---|
| **काम चालु असलेला ग्रेड सेपरेटर** | |
| १ | चिंचवड महावीर चौक ते शिवाजी चौक |
| २ | खंडोबामाळ चौक, आकुर्डी |

### प्रभागनिहाय पुलांची माहिती

| अ.क्र. | प्रभागाचे नाव | | पुलामुळे जोडला जाणारा भाग (पुलाचे नाव) |
|---|---|---|---|
| १ | अ प्रभाग | १) | दळवीनगर चिंचवड ते आकुर्डी रेल्वे ओव्हरब्रीज |
| | | २) | पुणे-मुंबई रस्त्यावर निगडी टिळक चौक उड्डाण पुल |
| | | ३) | स्पाईन रोड प्राधिकरण ते चिंचवड वाल्हेकरवाडी रेल्वेवरील पुल |
| २ | ब प्रभाग | १) | मुंबई पुणे रस्ता ते चिंचवडगाव रेल्वे ओव्हरब्रीज |
| | | २) | चिंचवडगाव ते थेरगाव नदीवरील पुल |
| | | ३) | मुंबई पुणे रस्ता पिंपरी ते पिंपरी कॅम्प जोडणारा पुल |
| | | ४) | चिंचवडगाव केशवनगर ते काळेवाडी |
| | | ५) | चिंचवडगाव मंदिर (मोरया गोसावी ) ते थेरगाव (धनेश्वर पुल) |
| | | ६) | मिलिंदनगर, पिंपरी ते काळेवाडी नदीवरील पुल |
| ३ | क प्रभाग | १) | पिंपरीगाव ते पिंपळे सौदागर नदीवरील पुल |
| | | २) | पिंपरी कॅम्प ते काळेवाडी पुल |
| | | ३) | सांगवी ते औंध नवा पुल |
| | | ४) | सांगवी ते बोपोडी नदीवरील पुल |
| | | ५) | सांगवी स्पायसर क़ॉलेज नदीवरील पुल |
| | | ६) | सांगवी ते दापोडी एस.टी. वर्कशॉप जवळील नदीवरील पुल |
| | | ७) | सांगवी पुणे रोड, औंध पुणे जुना पुल नुतणीकरण |
| | | ८) | महादेव मंदिर, पिंपरी ते रहाटणी नदीवरील पुल |
| | | ९) | पिंपळे निलख ते बाणेर पुल |